# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१७/३२-एफ/३८५
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : १४ मार्च,२०१७.

विषय: महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा "उप स्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी अभ्यासक्रम" (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम/ महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगर पंचायती/ विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन सेवेत अग्निशमन केंद्र अधिकारी/सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी/ उप अग्निशमन अधिकारी/सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक किंवा तत्सम पदावर नियुक्त करण्याबाबत.

## प रि प त्र क

संदर्भ : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.मअसे/२०१६/३२-एफ/६५५, दि.२६ एप्रिल,२०१६.
२. मा.उच्च न्यायालय, नागपूर बेंच येथे दाखल झालेल्या रिट पिटिशन क्र.५७४१/२०१६ वरील मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचा दि.१६.०१.२०१७ चा निर्णय.

राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिका / नगरपरिषदां / नगर पंचायतींमध्ये अग्निशमन सेवेमधील अग्निशमन केंद्रे आणि अग्निशमन वाहनांची तूट भरुन काढण्यासाठी तसेच अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबवण्याबाबत नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि.३१ ऑगस्ट,२००९ शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२० दि.१२.०८.२०१६ अन्वये राज्यात नव्याने प्रस्थापित झालेल्या व होणा-या "ड" वर्ग महानगरपालिका / नगरपरिषदा / नगर पंचायतींचा समावेश या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता दिलेली आहे. या अभियानामुळे राज्यात सुमारे ३८२ नवीन अग्निशमन केंद्र आणि ३३० नवीन अग्निशमन वाहने उपलब्ध होणार आहेत. ही अग्निशमन यंत्रणा कार्यरत ठेवण्यासाठी दि.३१ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयामध्ये मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार सुमारे १०,५६० एवढे मनुष्यबळ राज्यात आवश्यक आहे.

०२. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा व विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन विभागातील उप अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी तसेच अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर नियुक्ती करताना केवळ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा ६ महिने कालावधीचा अनुक्रमे उप स्थानक अधिकारी पाठयक्रम (Sub Officer Course), केंद्र अधिकारी व प्रशिक्षक पाठयक्रम (Station Officer & Instructor's Course), विभागीय अग्निशमन अधिकारी पाठयक्रम (Divisional Fire Officer Course) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जातो. कारण देशात अग्निशमन अधिका-यांचे प्रशिक्षण देणारी एकमेव शासकीय महाविद्यालय होते.

०३. दि.३१ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद (II) अग्निशमन सेवेतील कार्यरत मनुष्यबळाचे सक्षमीकरण (Capacity Building) नुसार या संचालनालयामार्फत नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांचे अधिकारी व कर्मचारी यांना तसेच अग्निशमन सेवा संचालनालयामध्ये कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळास औद्योगिक क्षेत्राच्या विकासामुळे रासायनिक व ज्वालाग्राही पदार्थामुळे

वाढलेल्या आगीचे धोके लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्याची सांविधीक जबाबदारी ही अग्निशमन अधिनियम,२००६ च्या कलम ३० नुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी आहे.

०४. त्यानुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीने अधिकाधिक अग्निशामक पदाचे प्रशिक्षण विविध महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन सेवेत सुरु करण्यासाठी त्यांना प्रादेशिक अग्निशमन सेवेचा दर्जा देवून मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, नवी मुंबई या महानगरापालिका तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तसेच सिडको या विशेष नियोजन प्राधिकरण्यांच्या अग्निशमन केंद्रांमध्ये अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम सुरु केले. तसेच या अग्निशमन अकादमीमध्ये १ वर्ष कालावधीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) पाठयक्रम" सुरु केला असून आतापर्यंत ११३ प्रशिक्षण अग्निशमन अधिकारी उपलब्ध झालेले आहेत.

०५. वरील संदर्भ क्र.२ नुसार मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट पिटिशन क्र.५७४१/२०१६ वरील मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचा दि.१६.०१.२०१७ चा निर्णयानुसार कोर्टाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

> *"If the respondents find that there are some other holders possessing qualification given by the Maharashtra Fire Service Academy, it is open to them to re-advertise the post immediately by making suitable amendment in the qualification part thereof. If the finds that it is not necessary to re-advertise, it has to consider eligibility of petitioners and find out whether they can be appointed in response to the advertisement. Fact that they are not holding qualification imparted by National Fire Service College, cannot be held against them.* ***Qualification obtained by them from Maharashtra Fire Service Academy is valid and enables them to compete in the process."***

०६. या संदर्भात अशा प्रशिक्षित उमेदवारांना महानगरपालिका/नगरपरिषदा/विशेष नियोजन प्राधिकरणे/ शासकीय/ निमशासकीय कार्यालयाच्या अग्निशमन दलात अधिकारी पदावर नियुक्ती देण्यासाठी वरील संदर्भ क्र.१ च्या दि.२६.०४.२०१६ च्या परिपत्रकानुसार सर्व संबंधीतांना सुचित करण्यात आलेले होते की, अग्निशमन सेवेतील सहाय्यक केंद अधिकारी/उप अग्निशमन अधिकारी/सहाय्यक अग्निशमन पर्यवेक्षक किंवा समकक्ष पदाच्या सेवा प्रवेश नियमांच्या शैक्षणिक अर्हतेसोबत पुढील प्रमाणे तांत्रिक अर्हतेमध्ये सुधारणा करावी, ज्यामध्ये "राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer's Course) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे." अशी असल्यास त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करावी :- "राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer's Course) किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमधील १ वर्ष कालावधीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अशा सुधारणा करण्याचे सुचविण्यात आलेले होते. वरील संदर्भ क्र.२ नुसार मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट पिटिशन क्र.५७४१/२०१६ वरील मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचा दि.१६.०१.२०१७ चा निर्णयानुसार वरील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

०७. तरीदेखील गेल्या काही महिन्यामध्ये वरील नमूद केलेल्या पदांसाठी जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालयांनी/स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांनी दिलेल्या जाहिरातीमध्ये "राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer's Course) उत्तीर्ण असणे

आवश्यक आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमधील १ वर्ष कालावधीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे " अशी तांत्रिक अर्हता न टाकता भरती केल्यामुळे काही प्रशिक्षार्थ्यांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठामध्ये जनहित याचिका दाखल केली.

०८. दरम्यान, मा.श्री.ह.मा.जावळे, विधान सभा सदस्य यांनी सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात *"महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचा उपस्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असून राज्यातील अनेक नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये रिक्त जागा असून राज्यात विविध ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडत असल्यामुळे अग्निशमन सेवेतील रिक्त पदे तात्काळ भरावीत"* असा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत शासनाकडून सक्रिय प्रतिसाद देण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन या कार्यालयातर्फे राज्यातील अ, ब, क व ड वर्ग महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी संवर्गातील पदांसाठी सामाईक आदर्श सेवा प्रवेश नियम तयार केले असून त्यामध्ये सदर अभ्यासक्रम विहित केला आहे.

०९. सबब, मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट पिटिशन क्र.५७४१/२०१६ वरील मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचा दि.१६.०१.२०१७ चा निर्णयानुसार कोर्टाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे सर्व शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम/महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणे यांना पुन्हा सुचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अग्निशमन दलातील अग्निशमन केंद्र अधिकारी/सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी/उप अग्निशमन अधिकारी/सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक किंवा तत्सम पदाच्या सेवा प्रवेश नियमात जेथे "राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer's Course) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे" असा उल्लेख आहे. तेथे **"राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer's Course) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमधील १ वर्ष कालावधीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे"** अशाप्रकारे तांत्रिक अर्हतेचा समावेश करुन सेवा प्रवेश नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करुन सदर पदांसांठी भरती प्रक्रिया करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची प्रत या संचानलयानाच्या www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४/३/१७

(प्र.सु.रहांगदळे)
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

**प्रति,**

मा.सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०३०.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वान्द्रे (पू), मुंबई-४०० ०५१.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई-४०० ०९३.

व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरण, पुणे.
इतर विशेष नियोजन प्राधिकरणे (म्हाडा, नागपूर सुधार प्रन्यास, मिहान, इत्यादी).
सर्व विभागीय आयुक्त, सर्व विभाग.
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
सर्व प्रमुख अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरणे.
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती.